जा.क्र. का. 15/वामुदत 2024-25/357
मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी तथा
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे-1
दिनांक 31/03/2024.

**आदेश**

विषय :- सन 2023-24 करिताचे वार्षिक दर तक्ते व मुल्यांकनाच्या मार्गदर्शक सूचना न बदलण्याबाबत तथा कायम ठेवण्याबाबत.

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क. मुद्रांक-2024/प्र.क्र.88/म-1 (धोरण) दि. 31/03/2024

ज्याअर्थी, महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तव बाजार मूल्यनिर्धारित करणे) नियम 1995 च्या नियम क्र.4 (3) अन्वये प्रती वर्षी एप्रिल महिन्याच्या 1 तारखेस महाराष्ट्र राज्यातील सर्व भौगोलिक क्षेत्रासाठी स्थावर मालमत्तेचे वार्षिक दर तक्ते निर्गमित करण्यात येतात.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तव बाजारमूल्य निर्धारित करणे) नियम 1995 च्या नियम 4 च्या उप-नियम क्र. (9) मधील तरतूदी अन्वये शासनाने संदर्भित पत्रान्वये निर्देश दिले आहेत.

त्याअर्थी, संदर्भित पत्रान्वये दिलेले शासनाचे निर्देश विचारात घेऊन सन 2024-25 या आर्थिक वर्षा करीता, दि.1/04/2022 पासून अंमलात असलेले सन 2022-23(सन 2023-24 साठी लागू) चे वार्षिकदर तक्ते, मूल्यांकन मार्गदर्शक सूचना व बांधकाम दर संपूर्ण राज्यासाठी कायम ठेवणेत येत आहेत.

सदरचे वार्षिक दर तक्ते नोंदणी विभागाच्या www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर online services या सदराखाली ASR याठिकाणी Process येथे उपलब्ध राहतील.

31/3/24

हिरालाल सोनवणे (भा.प्र.से.)
मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी तथा
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत माहितीसाठी सादर :-

1) मा.अपर मुख्य सचिव, महसूल, मुद्रांक शुल्क व नौदणी विभाग, मंत्रालय मुंबई 32 यांना सादर.
2) मा. महालेखापाल, (लेखापरिक्षा)-II, नागपूर.

प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी.

1) अप्पर मुद्रांक नियंत्रक, मुंबई.
2) वरिष्ठ तांत्रिक संचालक, एन.आय.सी. पुणे.
3) सहनोंदणी महानिरीक्षक, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.
4) सहसंचालक, नगर रचना, मूल्यांकन, महाराष्ट्र राज्य, पुणे माहिती व कार्यवाहीसाठी.
5) उपसंचालक, नगर रचना, मुंबई प्रदेश, मूल्यांकन मुंबई.
6) सहायक संचालक, नगर रचना, मूल्यांकन, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती/ नागपूर.
7) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक (मुख्यालय), पुणे.
8) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक (संगणक), पुणे.

/- सदर आदेश या विभागाच्या संकेत स्थळावर Upload करणेबाबतची कार्यवाही करणेत यावी.

9) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, मुंबई / कोकण / पुणे/ नाशिक /औरंगाबाद/ लातूर / अमरावती / नागपूर विभाग यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

/- सदर आदेशाबाबत आपले अधिनस्त सर्व नोंदणी कार्यालयांना तात्काळ अवगत करण्यात यावे. तसेच सदर आदेश त्यांना प्राप्त झाले असून, ते वाचलेबाबत (Read & Acknowledge) त्यांच्या कार्यालयाचा अहवाल प्राप्त करुन घेऊन या कार्यालयास पाठविणेत यावा.

10) सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क संचलनालय, मंत्रालय, मुंबई-32.
11) सह जिल्हा निबंधक, मुंबई शहर / मुंबई उपनगर जिल्हा.
12) सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी / सह जिल्हा निबंधक,

सह जिल्हा निबंधक यांनी आपल्या अधिनस्थ असलेल्या सर्व दुय्यम निबंधकांना सदर आदेशाबाबत तात्काळ अवगत करावे.